दिनांक ०४/११/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक भगवान अंबादास जाधव, पोलीस हवालदार, नेमणुक- पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर यांनी १०,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | भगवान अंबादास जाधव, वय ५५ वर्ष, पोलीस हवालदार, नेमणुक- पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर<br>रा. देवळाई चौक जवळ, शिवाजीनगर, औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १०,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी सातारा पोलीस ठाणे येथे दिलेल्या त्यांचे अर्जावर कार्यवाही करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | उमर टी हाऊस समोर, देवळाई चौक, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांनी पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे तक्रारी अर्ज दिला होता. सदर अर्जावर कार्यवाही करण्यासाठी भगवान जाधव, पोलीस हवालदार, नेमणुक पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर हे २०,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, भगवान जाधव, पोलीस हवालदार यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/- रु लाचेची मागणी करून, त्यापैकी १०,०००/- रु तात्काळ आणून देण्याचे व उर्वरीत १०,०००/- रु लाचेची रक्कम नंतर आणून देण्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक ०४/११/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, भगवान अंबादास जाधव, वय ५५ वर्ष, पोलीस हवालदार, नेमणुक- पोलीस सातारा, औरंगाबाद शहर यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन १०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना पोह गणेश पंडुरे, पोना अरुण उगले, प्रकाश घुगरे, चापोशि चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-1)** sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

पोलीस उप अधीक्षक कार्यालय * अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

04/11/2020

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.